साहसिक

सजग समाजाचा दक्ष प्रहरी

कार्यालय : शॉप नं. ७४,७५रजत संकुल, रॉय उद्योग परिसर, बसस्थानकच्या समोर, गणेशपेठ, नागपूर-१८

E-mail : dsahasikngp@gmail.com

श्री.अकील अहमद उर्फ गुड्डूभाई

कार्यकारी संपादक

मो.नं. ९८२२०९४०१४

दैनिक

epaper

www.sahsik.com

# साहसिक

सजग समाजाचा दक्ष प्रहरी



प्रो. बाळासाहेब गो. पांडे

मो. 9822574574

परवाना क्र. 1/1999

सरकार मान्य

आदर्श वैदिक विवाह मंगल कार्यालय

आमचे येथे जातीरिवाजा प्रमाणे हिंदु, बौध्द पध्दतीने जातीय, आंतरजातीय विवाह वैदिक पध्दतीने लावून देण्यात येईल.

तसेच लग्नाची नोंदणी पण करून दिल्या जाईल.

रिंग रोड, एक्सप्रेस हायवे, श्री स्वामी समर्थ महाराज मंदिर मागे, वर्धा.



वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम,यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

वर्ष : १२ अंक : ८३ शुक्रवार २८ सप्टेंबर २०१८ मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार (पाटील) (पृष्ठ -८) मूल्य : ३ रुपये


### दिनविशेष

* संकष्ट चतुर्थी
* जैन संपत्सरी पंचमी चतुर्थी

### सुविचार

तुमच्या ठायी शक्तिचा महा-सागर हेलावतो आहे.
तुम्ही सर्व काही करू शकता, या गोष्टीवर विश्वास असू द्या.
-स्वामी विवेकानंद

### हसा जरा जपून..

**बाबा :** काय रे...तुझ्या वर्गात सगळेजण पास झाले का?
**चंदु :** हो आम्ही सगळे पास झालो पण आमच्या मॅडम मात्र नापास झाल्या...
**बाबा :** ओ...मॅडम कशा नापास होतील गाढवा?
**चंदु :** हो बाबा...त्या अजुन त्याच वर्गाला शिकवितात.

# शरद पवार व इतर आरोपींना गंभीर गुन्ह्यातून वाचविण्यासाठी पदाचा दुरुपयोग करणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या दोन पूर्व सरन्यायाधीशांसह एकुण सहा न्यायाधीशांविरुद्ध फौजदारी कारवाई आणि कोर्ट अवमानना अंतर्गत कारवाईसाठी याचिका दाखल



**ॲड.निलेश ओझा**
राष्ट्रीय अध्यक्ष इंडीयन बार असोशिएशन



**ॲड.विजय कुर्ले**
अध्यक्ष-महाराष्ट्र प्रदेश इंडीयन बार असोशिएशन



**ॲड.विवेक रामटेके**
अध्यक्ष-डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान बचाव वकील परिषद



**राशीदखाना पठाण**
राष्ट्रीय सचिव -मानव अधिकार सुरक्षा परिषद

* **इंडियन बार असोसिएशनचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲड.विजय कुर्ले यांनी राष्ट्रपतींकडे दाखल केली याचिका**
* **भा.द.वि.२१८, २१९, १२० (B), ३४ आणि कोर्ट अवमानना अंतर्गत कारवाई**
* **शरद पवार यांना वाचविण्यासाठी (२०१०) मध्ये गैरकायदेशीर आदेश पारीत करणारे सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन सर न्यायाधीश श्री.के.जी. बालकृष्णन, न्या.श्री.दीपक वर्मा व न्या.डॉ.बी.एस.चव्हाण असे तीन न्यायाधीश आरोपी**
* **सेरगी व सीटीआर प्रकरणात (२०१६) मध्ये आरोपींच्या बाजूने निर्णय देणारे सर्वोच्च न्यायायालयाचे तत्कालीन मुख्य न्यायाधीश डॉ.टी.एस.ठाकूर, न्या.ए.के.सिक्री, न्या.आर.बानुमती हे तीन न्यायाधिश आरोपी**
* **वरील सहाही न्यायाधीशांनी सर्वोच्च न्यायालयाचे प्रितीश - वि.महाराष्ट्र शासन (२००२) १ सुप्रिम कोर्ट केसेस २५३ प्रकरणात पूर्ण खंडपीठाने दिलेल्या आदेशाची अवमानना करुन त्या नियमांविरुद्ध आदेश पारीत केल्याचे उघड**
* **न्या. ए.के. सिक्री व न्या.आर. भानुमती यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या संविधान पीठाने के.वीरस्वामी प्रकरणात (१९९१) १ SCC ६५५ नुसार घालून दिलेल्या निर्देषाप्रमाणे स्वतः राजीनामा द्यावा. अन्यथा मुख्य न्यायमुर्ती दीपक मिश्रा यांनी 'इन-हाऊस-प्रोसिजर' प्रमाणे या दोन्ही न्यायाधीशांना कोणतेही काम न देण्याचे आदेश पारीत करावे - याचिका कर्त्याची मागणी**
* **फौजदारी प्रक्रिया संहीताचे कलम ३४० अंतर्गत कारवाईमध्ये ठरलेल्या कायदेशीर प्रक्रियेविरुद्ध आदेश पारीत केल्याचे सिद्ध**
* **मानव अधिकार सुरक्षा परिषदचे राष्ट्रीय सचिव रशीद खान पठाण, आदिवासी महिला हक्क आंदोलन समितीच्या सौ.पुष्पा सोरती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान बचाव वकील परिषदचे ॲड.विवेक रामटेके इत्यादी अनेक संघटनांनी या प्रकरणी पाठींबा दिला आहे.**

**विशेष प्रतिनिधी / २७ सप्टेंबर**

**मुंबई :** न्यायालय हे एक असे मंदीर आहे जिथे प्रत्येक जाती पंथाचे व सर्व स्तराचे लोक न्याय प्राप्त करुन घेण्यासाठी येतात. जर न्यायालयात कोणीही खोटा पुरावा किंवा खोटी साक्ष, बनावट कागदपत्रे किंवा खोटे शपथपत्र दिले तर अश्या व्यक्तीस भा.दं.वि. चे १९१, १९२, १०३, १९९, २००, २११, ४६५, ४६०, ४७१, ४७४ इत्यादी कलमाअंतर्गत शिक्षेची तरतूद आहे. त्यामध्ये प्रत्येकी ७ वर्षापर्यंत शिक्षेची तरतूद आहे. अश्या केसेसची कार्यवाही कशी करावी याची प्रक्रिया Cr. P.C. फौजदारी प्रक्रिया संहिता मध्ये कलम ३४० मध्ये नमूद आहे.

**डॉ.** बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेमध्ये भविष्यात मोठ्या लोकांकडून कायद्याचा दुरुपयोग होऊ शकतो व सामान्य जनतेचे हक्क मारले जावू शकतात. ही संभावना लक्षात ठेवून त्याला निर्बंध म्हणून महत्वाचे कलम १४ चा अंतर्भाव केला होता. कलम १४ नुसार भारतातील सर्व नागरीक हे कायद्यापुढे समान असून कायद्याची अंमलबजावणी ही सर्वांसाठी समान अशी स्पष्ट तरतूद केली असून याबाबत सर्वोच्च न्यायालय व मुंबई उच्च न्यायालयाने वेळोवेळी कायदे ठरवून दिले आहेत.

परंतू शरद पवारांसारखे व्यक्ती आरोपी असतील तर सर्वोच्च न्यायालय सुद्धा कायद्याबाहेर जावून स्वत:च्याच आदेशाची अवमानना करुन बेकायदेशीर आदेश पारीत करत असेल तर जनसामान्यांची न्यायव्यवस्थेवरील आस्था अशी कायम राहील. संविधानाविरुद्ध कार्य करणाऱ्या कोणालाही माफी नाही.असा गैरकायदेशीर आदेश पारीत करणाऱ्या न्यायाधीशांना भा.दं.वि. २१८, २१९ कलमाअंतर्गत प्रत्येकी ७ वर्ष कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे. तसेच कोर्ट अवमानना कायद्याअंतर्गत ६ महिने शिक्षेची तरतूद आहे. या आधी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मार्कडेय काटजू यांच्याविरुद्ध कार्यवाही झाली असून न्या.कर्णन यांना ६ महिने तुरुंगवास झाला आहे. तशीच कारवाई सहा न्यायाधीशांविरुद्ध त्वरीत करणे आवश्यक आहे. जर न्यायाधीशांच्या चुकांविरुद्ध काहीही कारवाई केली नाही तर लोकांच्या विश्वासास तडा जाईल असे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या संविधान पीठाने के.वीरस्वामी (१९९१) १ SCC ६५५ प्रकरणात स्पष्ट केले आहे.

आजकाल कोणाची जमीन/मालमत्ता बळकाविणे, नवरा बायकोने एकमेकांविरुद्ध खोट्या केसेस दाखल करणे खोटे पुरावे देवून पोटगी मागणे असे अनेक गैरप्रकार सर्रास सुरु आहेत. असा कोणताही गुन्हा केल्यास संबंधीत आरोपीविरुद्ध कारवाई करण्यासाठी पिडीत व्यक्तीने किंवा कोणीही ३४० Cr. P.C. अंतर्गत न्यायालयास

(उर्वरित पान २ वर)

## शरद पवारांना वाचविण्यासाठी अण्णा हजारे यांच्या याचिकेवर सुध्दा मुंबई उच्च न्यायालयाने बदलला कायदा

### २५ हजार कोटीच्या सिंचन घोटाळ्यात ६ जानेवारी २०१७ पासुन याचिका प्रलंबित



**मा. अण्णाजी हजारे**
जेष्ठ समाजसेवक

**जर** एखादा मोठा आर्थीक घोटाळा असेल तर उच्च न्यायालय स्वत:हुन गुन्हा नोंद करुन तपास करण्याचे आदेश देवू शकतो असा स्पष्ट कायदा मा. मुंबई उच्च न्यायालयाचे न्या.ए.एम.खानविलकर व न्या.ए.पी.भंगाळे यांच्या खंडपीठाने चारू मेहता-वि-महाराष्ट्र शासन प्रकरणात २०११ ALL MR (Cri) १७३ प्रकरणात दिले आहेत. तसेच द प्रॉव्हीडंट फंड इंन्व्हेस्टमेंट कं.लि.वि.हेमलता देव प्रकरणात १३ जानेवारी २०१२ च्या आदेशात न्या.डॉ.डी. वाय.चंन्द्रचुड व न्या. ए.ए.सईद यांच्या खंडपीठाने सी.बी.आय. ला गुन्ह्याचा तपास करण्याचे आदेश दिले त्यावर सी.बी.आय. ने नंतर गुन्हा (F.I.R ) नोंद केला. याशिवाय सोहराबुद्दीन शेख प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने साध्या पोस्टाने पाठविलेल्या पत्राला याचिका बनवून सी.बी.आय. कडे प्रकरण वर्ग केले असे अनेक कायदे आहेत.

परंतु जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी जेव्हा शरद पवार, अजीत पवार यांच्याविरुध्द सी.बी.आय. चौकशीसाठी याचिका दाखल केली त्यावेळी दि. ६ जानेवारी २०१७ सुनावणी साठी आली त्यावेळी न्या. अभय ओक यांनी अण्णा हजारेंना सांगितले की तुम्ही प्रथम पोलिसांत तक्रार द्या नंतर आम्ही बघू.

अण्णा हजारे यांनी सर्व जनतेच्या वतीने शासनाच्या तिजोरीवर २५,००० कोटी

(उर्वरित पान २ वर)


## उर्जा दक्षता विषयावर बाल-कलाकारानां आपले विचार व्यक्त करण्याची सुवर्ण संधी



उर्जा संरक्षण २०१८वर राष्ट्रीय चित्रकला स्पर्धा साठी येण्यास आणि विश्व उर्जा दक्षता वर आपले विचार स्पष्ट करण्यासाठी

अंतिम दिनांक २६ आक्टोंबर २०१८

विषय

श्रेणी 'क' (४,५ आणि ६ कक्षा)
* उर्जा हे जिवन आहे त्याला संरक्षणीत करा
* उर्जा वाचविणे हे एक उच्च विचार
* उर्जा बचत जिवन सतत

श्रेणी 'ख' (७,८ आणि ९ कक्षा)
* दुसऱ्यासाठी उर्जा वाचवा
* उर्जा वाचवा राष्ट्र वाचवा
* सुर्य, हवा आणि पानी हे उर्जा संसाधन साठी नाही वरदानी

३ स्तर चित्रकला स्पर्धा- शाळा,राज्य,राष्ट्रीय

राज्य संघ राष्ट्रीय क्षेत्र स्तर

| बक्षीस | श्रेणी 'क' | श्रेणी 'ख' |
|---|---|---|
| पहिला पुरस्कार | २०,०००/-रू. | २०,०००/-रू. |
| दुसरा पुरस्कार | १५,०००/-रू. | १५,०००/-रू. |
| तिसरा पुरस्कार | १०,०००/-रू. | १०,०००/-रू. |
| सांत्वना (१० पुरस्कार) | ५,०००/-रू. | ५,०००/-रू. |

| राष्ट्रीय स्तर | श्रेणी 'क' | | श्रेणी 'क' | |
|---|---|---|---|---|
| बक्षीस | बक्षीस ची संख्या | राशि | बक्षीस ची संख्या | राशि |
| पहिला पुरस्कार | १ पुरस्कार | १,००,०००/-रू. | (१ पुरस्कार) | १,००,०००/-रू. |
| दुसरा पुरस्कार | ४ पुरस्कार | ५०,०००/-रू. | (२ पुरस्कार) | ५०,०००/-रू. |
| तिसरा पुरस्कार | ८ पुरस्कार | २५,०००/-रू. | (३ पुरस्कार) | २५,०००/-रू. |
| सांत्वना (१० पुरस्कार) | (१० पुरस्कार) | १०,०००/-रू. | (६ पुरस्कार) | १०,०००/-रू. |

For more information please contact:
State Nodal Officer's address for Maharashtra
Manager (HR), NTPC-Western Region - I HQ, Samruddi Venture Park, 2nd Floor, MIDC, Andheri (East), Mumbai-400093 (Maharashtra) (O) 022 28310213 (M) 9421023500, Fax: 022-28259331,
E-mail: akprasad@ntpc.co.in, prwrhq1@gmail.com

davp 34106/13/0041/1819

स्वच्छ भारत एक कदम स्वच्छता की ओर

Ministry of Power
Government of India

सौभाग्य प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना

उर्जा संरक्षण :उर्जा सुरक्षित राष्ट्राचा मार्ग


# व्यभिचाराला गुन्हा ठरवणारे कलम रद्द, सुप्रीम कोर्टाचा ऐतिहासिक निकाल

**वृत्तसंस्था / २७ सप्टेंबर**

**नवी दिल्ली :** व्यभिचार हा गुन्हा ठरवणारे कलम ४९७ रद्द करण्याचा ऐतिहासिक निकाल सुप्रीम कोर्टाने दिला आहे. पती हा पत्नीचा मालक नसल्याचे सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे. व्यभिचार हा गुन्हा ठरु शकत नाही. पण जर एखाद्या व्यक्तीने जोडीदाराच्या विवाहबाह्य संबंधांमुळे आत्महत्या केली तर ते आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा ठरतो, असे कोर्टाने स्पष्ट केले.




अनिवासी भारतीय असलेले जोसेफ शाइन यांनी वकील सुविदुत सुंदरम यांच्या मार्फत कलम ४९७ च्या वैधतेला आव्हान दिले होते. यात गुन्हेगारी दंडसंहिता कलम १९८(२) चाही समावेश आहे. व्यभिचारात केवळ पुरूषांनाच दोषी ठरवून शिक्षा केली जाते, याबाबत स्त्रियांचाही विचार समान पातळीवर करावा, अशी मागणी त्यांनी केली होती. जानेवारीला सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्या तीन सदस्यीय पीठाने ही लोकहिताची याचिका घटनापीठाकडे सुनावणीसाठी दिली होती. १९५४, १९८५ व १९८८ या तीन निकालात कलम ४९७ वैध ठरवण्यात आले होते.सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील घटनापीठाने गुरुवारी या याचिकेवर निर्णय दिला. न्या. ए एम खानविलकर, न्या. आर एफ नरिमन, न्या. डी वाय चंद्रचूड, न्या. इंदू मल्होत्रा यांचा घटनापीठात समावेश होता. सुप्रीम कोर्टाने व्यभिचाराला गुन्हा ठरवणारे आयपीसीतील कलम ४९७ रद्द करण्याचा निर्णय दिला. व्यभिचार हा घटस्फोटासाठी कारण म्हणून गृहित धरता येईल, मात्र तो गुन्हा ठरत नसल्याचे कोर्टाने स्पष्ट केले. जगातील बहुतांशी देशांमध्ये व्यभिचाराला गुन्हा ठरवणारे कलम रद्द करण्यात आले. भारतीय दंड विधानातील हे कलमच असंवैधानिक असल्याचे कोर्टाने सांगितले.

**सध्या होते काय?**

भादंवि कलम ४९७ नुसार एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या पुरूषाच्या पत्नीशी त्याच्या संमतीशिवाय लैंगिक संबंध ठेवले तर तो बलात्कार ठरत नाही, तर त्याला व्यभिचाराचा गुन्हा म्हणतात. यात पाच वर्षे तुरूंगवास किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होते, पण यात जी स्त्री असे लैंगिक संबंध ठेवते तिला दोषी धरले जात नाही किंवा शिक्षाही दिली जात नाही. यात केवळ विवाहित महिलेशी लैंगिक संबंध ठेवणे हा व्यभिचार ठरतो. विधवा, वेश्या किंवा अविवाहित महिलांना हे कलम लागू होत नाही, असे दिल्ली उच्च न्यायालयाने ब्रिज लाल विरूद्ध राज्य सरकार (१९९६) खटल्यात स्पष्ट केले होते.